# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 09 January 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०९ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

********

- भारतीय समुदायाच्या जगभरातल्या उत्तम कामगिरीचा देशाला अभिमान– पंतप्रधानांचे गौरवोद्गार
- नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्वांगीण विकासाचं उद्दिष्ट ठेवण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- कन्या भ्रूण हत्येच्या प्रतिबंधासाठी नागरिकांनी पुढे यावं–छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांचं आवाहन

आणि

- अनधिकृत मासेमारी नौकांवर नजर ठेवण्यासाठी डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली कार्यान्वित

********

भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. ते आज ओदिशामध्ये भुवनेश्वर इथं अठराव्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते. 'परदेशस्थ भारतीयांचं विकसित भारतासाठी योगदान', ही यंदाच्या या तीन दिवसीय संमेलनाची संकल्पना आहे. प्रवासी भारतीयांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले –

***साल 1947 में भारत को आजादी मिली। उसमें एक बडा रोल हमारे डायस्पोरा का भी रहा है। उन्होंने विदेशों मे रहकर भारत की आजादी के लिये कॉन्ट्रीब्युट किया। हमारे सामने 2047 का टार्गेट है। हमें भारत को विकसित देश– एक डेव्हलप नेशन बनाना है। आप आज भी***

***भारत की ग्रोथ मे शानदार कॉन्ट्रीब्युशन कर रहे है। और विकसित भारत की जर्नी को और ताकद दे सकते है। आपका हर प्रयास भारत को मजबूत करेगा।***

भारतीय समुदायाच्या पर्यटनासाठी खास तयार करण्यात आलेल्या 'प्रवासी भारतीय एक्स्प्रेस'ला पंतप्रधानांनी यावेळी दृक्श्राव्य माध्यमातून हिरवा झेंडा दाखवला. विविध देशांमधल्या भारतीय समुदायाचे सदस्य तसंच अनेक केंद्रीय मंत्री या अधिवेशनाला उपस्थित आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या समारोप समारंभाला उपस्थित राहणार असून, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या परदेशस्थ भारतीय सदस्यांना 'राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान' प्रदान करणार आहेत.

****

राज्यातील ४२३ शहरांमधील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्व अत्यावश्यक आणि दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून सर्वांगीण विकासाचं उद्दिष्ट ठेवण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. येत्या शंभर दिवसात करण्याची कामं आणि आराखड्याच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी आज विविध विभागांच्या बैठका घेतल्या, त्यावेळी हे निर्देश दिले.

औद्योगिक विकास महामंडळाकडच्या जागांच्या वाटपाची प्रक्रिया येत्या १०० दिवसांत पूर्ण करावी, तसंच उद्योग विषयक धोरणांमध्ये कालानुरूप बदल करण्यासंदर्भात तातडीनं आराखडा तयार करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली आहे. मृद आणि जलसंधारण आणि कामगार विभागासह अनेक विभागांची मुख्यमंत्र्यांनी आज बैठक घेऊन आवश्यक सूचना केल्या.

****

येत्या ३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान राज्यातल्या सर्व कारागृहांमध्ये निःक्षय शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. देशभरात सुरू असलेल्या क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहिलं आहे. सर्व कारागृहं तसंच सुधारगृहांमध्ये १०० दिवसांच्या या अभियानाचं आयोजन करण्याचे निर्देश या पत्रात दिले आहेत.

दरम्यान, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेत या अभियानांतर्गत आज क्ष-किरण यंत्र वाहनाचं अनावरण आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते

करण्यात आलं, तर लातूर इथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते क्षयरुग्णांना पोषण आहाराचं वितरण करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या गर्भलिंग चाचण्या आणि त्यानंतर होणाऱ्या कन्या भ्रूण हत्येस आळा घालण्यासाठी नागरिकांनी पुढे येण्याचं आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयात यासंदर्भातल्या बैठकीनंतर ते बोलत होते. जिल्ह्यात फिरत्या वाहनांमध्ये गर्भलिंग निदान चाचण्या करणाऱ्या अनधिकृत व्यक्ती वावरत असल्याचं जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आलं असून त्याबाबत कडक उपाययोजना करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. नागरिकांना यासंबंधी काही माहिती मिळाली तर १८०० २३३ ४४ ७५ या नि:शुल्क क्रमांकावर माहिती द्यावी, माहिती देणाऱ्याचं नाव गोपनीय ठेवलं जाणार असून, संबंधितांना पारितोषिक दिलं जाणार असल्याचं स्वामी यांनी सांगितलं. ते म्हणाले –

> ***गर्भलिंग तपासणी याची कायद्यान्वये बंदी घातलेली आहे. अशा प्रकारचं केल्याचं निदर्शनास आल्यास शिक्षा होऊ शकते. मी समस्त नागरिकांना विनम्र आवाहन करतो, की आपणाला जर अशा पद्धतीने कोणत्या ठिकाणी गर्भलिंगनिदान तपासणी होत असल्याचं निदर्शनास आल्यास टोल फ्री क्रमांकावर आपण संपर्क साधावा. किंवा जिल्ह्यातील, प्रशासनातील कुठल्याही वरीष्ठ अधिकाऱ्यांना आपण याबद्दलची माहिती दिली, तर आपलं नाव गोपनीय राखलं जाईल. आणि त्या घटनेची सत्यता पडताळल्यानंतर आपल्याला रोख स्वरूपामध्ये इनाम सुद्धा दिलं जाईल.***

****

संतोष देशमुख हत्या प्रकरणातला आरोपी वाल्मिक कराड याला मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीनं यापूर्वीच नोटीस दिली होती, त्यावर ईडीने कारवाई केली असती तर सरपंच हत्याप्रकरण घडलंच नसतं, असं मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केलं आहे. त्या मुंबईत वार्ताहरांशी बोलत होत्या. यासंदर्भात ईडी कारवाईबाबत आपण अर्थमंत्र्यांना पत्र लिहिणार असल्याचं सुळे यांनी सांगितलं.

****

वंजारी समाज आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्याविषयी मनोज जरांगे पाटील यांनी चिथावणीखोर वक्तव्यं केल्याचा आरोप करत आज बीड जिल्ह्याच्या पाटोदा पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन करण्यात आलं. मनोज जरांगे पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी या आंदोलकांनी यावेळी केली. गडचिरोलीतही याच मागणीसाठी आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आलं.

****

एकविसावा थर्ड आय आशियायी चित्रपट महोत्सव उद्यापासून येत्या सोळा तारखेपर्यंत मुंबई आणि ठाण्यात आयोजित करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये गाजलेल्या 'ब्लॅक डॉग' या चिनी चित्रपटानं या महोत्सवाची सुरुवात होणार आहे. यावेळी सुप्रसिद्ध पटकथा लेखक आणि गीतकार जावेद अख्तर यांना, चित्रपट क्षेत्रातल्या योगदानाबद्दल 'एशियन कल्चर' या विशेष पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे.

****

राज्याच्या किनारपट्टीवर अनधिकृत मासेमारी नौकांवर नजर ठेवण्यासाठी ड्रोनच्या आधारे देखरेख ठेवणारी डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली आजपासून कार्यान्वीत झाली. मत्स्यव्यवसाय आणि बंदरमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते मुंबईत आयुक्त कार्यालयात या प्रणालीच्या नियंत्रण कक्षाचं आज उद्घाटन करण्यात आलं. रत्नागिरीतल्या भाट्ये समुद्रकिनाऱ्यावर जिल्ह्याच्या अपर पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांनी हिरवा झेंडा दाखवल्यानंतर या यंत्रणेचा ड्रोन समुद्रावर झेपावला. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून –

**ड्रोनआधारे देखरेख ठेवणारी डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली राबवल्यामुळे परप्रांतीय मच्छिमारांमार्फत महाराष्ट्राच्या क्षेत्रात होत असलेल्या अवैध मासेमारीवर नियंत्रण येणार आहे. या प्रणालीमुळे सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळी अधिक क्षेत्र देखरेखीखाली येईल. मासेमारी नौकांच्या मॅपिंगमुळे अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती सहज उपलब्ध होईल.**

**आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

ही यंत्रप्रणाली राबवल्यामुळे परप्रांतीय मच्छिमारांमार्फत महाराष्ट्राच्या क्षेत्रात होत असलेल्या अवैध मासेमारीवर नियंत्रण येणार असून, सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होणार आहे.

****

हिंगोली जिल्ह्याच्या ग्रामपंचायत निवडणुकीनंतर खर्च सादर न करणाऱ्या एक हजार पंचेचाळीस जणांना पाच वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवण्यात आलं आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी याबाबतचे आदेश जारी केले. हिंगोली जिल्ह्यातल्या पाचशे त्रेसष्ठ ग्रामपंचायतींच्या निवडणुका २०२१ च्या जानेवारीमध्ये झाल्या होत्या, ही निवडणूक लढवणाऱ्यांना निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत खर्चाचा ताळेबंद सादर करणं आवश्यक होतं, मात्र वारंवार नोटीस पाठवूनही खर्च सादर न केल्यानं ही कारवाई करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

शाकंभरी नवरात्र महोत्सवात आज तुळजाभवानी देवीची विशेष मुरली अलंकार महापूजा करण्यात आली. यासंदर्भातल्या आख्यायिकेनुसार, तुळजाभवानी मातेनं दैत्याचा वध केल्यानंतर श्रीकृष्णाने आपली मुरली श्रीदेवीस अर्पण केली, त्याची आठवण म्हणून मुरली अलंकार महापूजा मांडली जाते.

****

स्वामी विवेकानंद यांच्या येत्या जयंती दिनी म्हणजे बारा जानेवारीला राष्ट्रीय युवा दिनानिमित्त नांदेडमधल्या हिमायतनगर इथल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****